**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मुनाफ नझीरअहमद विजापुरे
जयहिंद मटन शॉप, विटा नाका, पो.तासगाव, जि.सांगली — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.४.२००९ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.मुनाफ नझीरअहमद विजापुरे
जयहिंद मटन शॉप, विटा नाका, पो.तासगाव, जि.सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद श्री.शेख जफर शेख इब्राहिम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.१२.२००७ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.४.४.२००९ रोजी घेण्यात आली.

सन १९९५ मध्ये वक्फ अधिनियमानुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ अस्तित्वात आले. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सांगली यांनी सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियमानुसार त्यांच्या कार्यालयात नोंद असलेल्या वक्फ न्यासाची व्यवस्थापनाची स्कीम मंजूर होऊन मिळण्यासाठी केलेल्या अर्जाची सुनावणी लवकर होऊन त्यासाठीच्या नोटिसा काढण्यात याव्यात, अशी मागणी अपीलकर्ता श्री.मुनाफ नजीरअहमद विजापुरे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांच्याकडे केली होती. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मुस्लीम वक्फ न्यासाची कागदपत्रे आपल्याकडे प्राप्त झाली नसल्यास अंदाजे केव्हा प्राप्त होतील, अशी विचारणाही त्यांनी केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क भरल्यानंतरही आपल्याला माहिती दिली नाही. अपुऱ्या माहितीची तीन पाने दिली व त्याचे १०० रुपये शुल्क घेतले, अशी तक्रार श्री.विजापुरे यांनी केली.

श्री.विजापुरे यांनी मागितलेली माहिती संचिकेत उपलब्ध होती, ती सर्व दिली. उच्च न्यायालयातील रीट अर्जाचा क्रमांक त्यांनी दिला नव्हता त्यामुळे शोध घेणे अडचणीचे होते. तसेच वक्फ न्यासाचे व्यवस्थापन मंडळ अस्तित्वात येण्यासाठी नोटीसा काढणे आदी बाबी प्रशासकीय कार्यवाहीच्या असून वक्फ मंडळाकडे त्याचा पाठपुरावा करावा, असे श्री.विजापुरे यांना कळविले होते. श्री.विजापुरे म्हणतात तसा उच्च न्यायालयाचा आदेश अभिलेखात आढळत नाही, असेही

त्यांना लेखी कळविण्यात आले, असे जन माहिती अधिकारी श्री.शेख जफर शेख इब्राहीम यांनी तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांच्या अनुषंगिक पत्रव्यवहारासह नमूद केले.

वक्फ न्यासाचे व्यवस्थापन मंडळ अस्तित्वात येण्यासाठी नोटिसा काढणे आदी बाबी ही प्रशासकीय कार्यवाहीची मागणी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तिचा समावेश होत नाही. श्री.विजापुरे यांना माहिती देण्यात आली आहे. मात्र ती विहित मुदतीत दिलेली नाही. या विलंबाबाबतचे स्पष्टीकरण तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.महंमद मुजफ्फर सिद्दीकी यांनी आयोगाला सादर करावे, तसेच श्री.विजापुरे यांना माहिती विलंबामुळे निःशुल्क देणे आवश्यक असताना आकारलेले शुल्क रु.१०० व्यक्तिशः स्वतः परत करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. माहिती प्राप्त करुन घेऊन श्री.विजापुरे यांना पुरविण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तारीखवार अहवाल श्री.सिद्दीकी यांनी दि.२.६.२००९ च्या पत्रान्वये पूरक कागदपत्रांसह दिला. तो पाहता विलंब क्षमापित करण्यात येत आहे. श्री.विजापुरे यांनी पाठविलेली शुल्काची रक्कम रुपये १००/- त्यावेळचे आवक विभागाचे प्रमुख श्री.सिराजअहमद खान यांनी घेतली, पण कार्यालयात जमा केली नाही, अशाच प्रकारे अफरातफरीच्या कारणामुळे श्री.खान सध्या निलंबित आहेत. तरीही श्री.विजापुरे यांना रक्कम रुपये १००/- परत करण्यात येत आहे, असेही श्री.सिद्दीकी यांनी अहवालात नमूद केले आहे. त्याची नोंद घेण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.१०.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

रजिस्टर ओ.डी.ने रवाना

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ प्रमाणे अर्ज

प्रति,

जनमाहीती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,
पनचक्की, औरंगाबाद, (महाराष्ट्र)

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :- मुनाफ मजीरअहमद विजापूरे

२) अर्जदाराचा संपूर्ण पत्ता :- जयहिंद मटण शॉप, विटा नाका मु.पो. तासगांव, जि. सांगली.

३) आवश्यक असलेल्या माहितीचा :- तपशिल.

(एक) माहीतीचा विषय :- सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सांगली यांचेकडून दर्गा हजरत जहाँनिया पीर साहेब दर्गा तासगांव, पी.टी.आर.नं. बी/१८४ (सांगली) या वक्फ - ट्रस्टचे नोंदणीसहचे सर्व कागदपत्रे प्राप्त झाली किंवा कसे याबाबत.

(दोन) माहीतीचा संबंधीत कालावधी :- जानेवारी, २००७ ते आजअखेर

(तीन) आवश्यक असलेल्या माहीतीचे वर्णन/ तपशिल :- (१) वक्फ अधिनियम १९९५ प्रमाणे महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड अस्तित्वात आल्यानुसार मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये नोंद झालेले "बी" संवर्गाखालील मुस्लिम वक्फ-मिळकती व वक्फ - ट्रस्ट संस्था यांचे नोंदणी सहचे सर्व कागदपत्र, मुंबई उच्च न्यायालयाच्या कोणत्या रीट पीटीशन मध्ये वक्फ बोर्डाकडे हुकुम झाला आहे. त्या हुकुमाची सही-शिक्क्याची नक्कल मिळावी. नक्कलेची खर्च भरणेस तयार आहे तो कळवावा.

(२) वर कलम (१) मध्ये नमूद केलेल्या हुकुमानुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्त सांगली यांनी त्यांच्या कार्यालयात ट्रस्ट ॲक्ट प्रमाणे नोंद असलेल्या मुस्लीम वक्फ

त्या ट्रस्ट यांचे नोंदणीसहचे सर्व कागदपत्रे (चेंज रिपोर्ट, स्कीम अर्ज, वगैरे प्रकरणे ) यासह आपल्या कार्यालयाकडे पाठविली आहेत काय ? असल्यास ती आपल्या कार्यालयात प्राप्त झाली आहेत काय ? असल्यास, दर्गाह हजरत वलीमियाँ पीर साहेब दर्गाह ट्रस्ट, पीटीआर नं. बी/१६४ (सांगली ) या वक्फ-ट्रस्टचे नोंदणीसहचे कागदपत्रां मध्ये आम्ही अर्ज क्र. ४४९/९६ या क्रमांकाने सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सांगली यांचेकडे नोंद असलेल्या वक्फ न्यासाची व्यवस्थापनाची स्कीम मंजूर होवून मिळणेसाठी अर्ज केला आहे. त्याची सुनावणी लवकर होणे जरूरीचे आहे. सबब ती सर्व कागदपत्रे प्राप्त झाली असेल तर तिला सुनावणी पूर्व नोटीसा काढणेत याव्यात सध्या न्यास ट्रस्टचे व्यवस्थापन डी फॅक्टो ट्रस्टी व्यवस्थापक म्हणून मी व अन्य व्यक्ती पहात आहोत. स्कीम नुसार व्यवस्थापन मंडळ कार्यरत होणे जरूरीचे असल्याने वरील स्कीम प्रकरणाच्या सुनावणीपूर्व नोटीसा निघणे जरूरीचे आहे. सबब तशा नोटीसा काढणेत याव्यात. नामदार हायकोर्टाचे आदेशाप्रमाणे मुस्लीम वक्फ न्यासाचे कागदपत्रे आपल्याकडे प्राप्त झाली नसल्यास अंदाजे केंव्हा प्राप्त होतील याबद्दल मला माहीती द्यावी.

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशा हवी आहे किंवा कसे. :- टपालाद्वारे.

(पाच) टपालाद्वारे हवी असल्यास (नोंदणीकृत किंवा साधा) :- नोंदणीकृत

(सहा) अर्जदार दारीद्र्य रेषेखालील आहे काय ? :- नाही.

ता. २२/०३/२००७.

तासगाव.

मुनाफ नझीर अत्तिनायरे

( अर्जदार)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उत्तमराव हंबीरराव निकम व
श्री.शरद अधिकराव पाटील
शिंत्रे हॉस्पिटल बिल्डिंग, सिव्हील हॉस्पिटलजवळ,
आंबेडकर रोड, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपिलीय प्राधिकारी,
डॉ.जेजे.मगदूम आयुर्वेद मेडिकल कॉलेज,
शिरोळवाडी रोड, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, डॉ.जेजे.मगदूम आयुर्वेद मेडिकल कॉलेज,
शिरोळवाडी रोड, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१८+५३९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपिलीय प्राधिकारी, डॉ.जे.जे.मगदूम आयुर्वेद मेडिकल कॉलेज, शिरोळवाडी रोड, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर डॉ.आनंद शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, डॉ.जे.जे.मगदूम आयुर्वेद मेडिकल कॉलेज, शिरोळवाडी रोड, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर डॉ.एस.एस.जोशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम'त या अपिलाचा समावेश होता. यावेळी उभय बाजू हजर न राहिल्यामुळे दि.२९.४.२००९ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली. सुनावणीला अपीलकर्ता हे गैरहजर होते.

आपल्याला सातत्याने अपुरी व चुकीची माहिती दिली जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.उत्तमराव हंबीरराव निकम व श्री.शरद अधिकराव पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अर्ज योग्य अधिकाऱ्यांकडे न करणे, विहित शुल्क न लावणे, अर्ज केल्यानंतर विहित मुदतीनुसार उत्तरासाठी तीस दिवसांची वाट न पाहता माहिती नाकारल्याचे नमूद करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील करणे, त्यांच्या निर्णयाआधीच राज्य माहिती आयोगाकडे अपील करणे व माहिती दिल्यानंतरही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर खोटेपणाचा आरोप करुन माहिती न मिळाल्याची तक्रार करणे अशा स्वरुपाची कृती अपीलकर्ता वेळोवेळी करीत आले आहेत, असे अपिलीय प्राधिकारी डॉ.जे.जे.मगदूम आयुर्वेद मेडिकल कॉलेज, शिरोळवाडी रोड, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर डॉ.आनंद शिंदे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. महाविद्यालयाने आपल्याकडून जास्त शिक्षणशुल्क घेतल्याची अपीलकर्त्यातील श्री.शरद अधिकराव पाटील या विद्यार्थ्याची तक्रार आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात त्यांनी दाखल केलेले अपील उच्च न्यायालयाने निकाली काढले आहे, असे प्रतिपादन

जन माहिती अधिकारी डॉ.एस.एस.जोशी व अपिलीय प्राधिकारी डॉ.आनंद शिंदे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ही कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. ते न करता अर्ज व अपिले करणे हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा योग्य वापर नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि.३१.१०.२००९

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.लक्ष्मीकांत गोपीनाथ लोंढे
मु.पो.स्वामी चिंचोली, ता.दौंड, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय,
विधानभवन, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय,
विधानभवन, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री.लक्ष्मीकांत गोपीनाथ लोंढे<br>मु.पो.स्वामी चिंचोली, ता.दौंड, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>विधानभवन, पुणे-१ | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०९.०९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.०९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.०९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०६.१०.२००६ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>दि.३१.१०.१९९४ च्या निवड मंडळाच्या जाहिरातीप्रमाणे दि.०७.०१.१९९६ रोजी तलाठी पदाची २०० मार्कांची परीक्षा झाली त्या परीक्षेचा निकाल, प्रतिक्षायादी | |

## विवेचन

प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळातर्फे झालेल्या तलाठी पदाच्या परीक्षेबद्दलची माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्या पातळीवरुन उपलब्ध झाली नाही. दुय्यम सेवा मंडळ बरखास्त झाल्यामुळे माहिती उपलब्ध नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.लक्ष्मीकांत गोपीनाथ लोंढे यांनी केले.

श्री.लक्ष्मीकांत गोपीनाथ लोंढे यांनी तलाठी पदासाठी दि.०७.०१.१९९६ रोजी परीक्षा दिली होती. दि.११.०६.१९९९ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील दुय्यम सेवा मंडळे बरखास्त करण्यात आली. निवड मंडळाकडून विभागीय आयुक्त कार्यालयाला निवड यादी व्यतिरिक्त अन्य कागदपत्रे प्राप्त झलेली नाहीत. तसेच परीक्षेची सर्व कागदपत्रे ६ महिन्यांत किंवा पुढील परीक्षा होईपर्यंत नाश केले जातात. फक्त निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्रे ठेवली जातात, असे लेखी व तोंडी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, सामान्य प्रशासन बिभाग, विधानभवन, पुणे यांनी केले. याबाबतची सर्व माहिती श्री.लोंढे यांना देण्यात आली असून निवड सूची फक्त १ वर्ष ग्राह्य राहते. त्यामुळे यादी रद्द करण्याचा आदेश काढण्याची आवश्यकता नसते, असे अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, बिभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी दि.०१.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**पुणे**
**दिनांक : १४ / १०/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. प्रकाश जयसिंग सोनमळे
१३८/४०९४, कन्नमवार नगर नं. २,
विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०००८३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गटविकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती, सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत, लिंब, ता. व जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.३.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** गटविकास अधिकारी (वर्ग-१),<br>पंचायत समिती, सातारा.<br>प्रतिनिधी श्री. एस. एन. नागणे, विस्तार अधिकारी (पं.)<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत, लिंब, ता. व जि. सातारा<br>श्री.बी. एस. सावंत | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.४.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र अ) सोबत जोडले आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्री. प्रकाश जयसिंग सोनमळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाचा समावेश दिनांक ५.२.२००९ रोजीच्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा' मध्ये होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याने दिनांक १८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. आयोगाकडील अपील मागे घेत असल्याचे पत्र अपीलकर्ता श्री. सोनमळे यांनी दिले असल्याचे जनमाहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी श्री. सोनमळे यांच्या पत्राच्या प्रतीसह नमूद केले.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१-१०-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विजय शंकर देसाई
स.नं.५३, शिवाजी हाईटस, यशवंतराव चव्हाण
नाट्यगृहासमोर, कोथरूड, पुणे-४११ ०२९

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४ /पुणे + तक्रार - ८४ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.८.२००८ |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. मदन रामचंद्र आढारी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. अनिरूध्द घन:श्याम पावसकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.४.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सि.टी. सर्व्हे क्र. ५३, कोथरूड समोरील डी.पी. रोड बदलाबाबत माहिती, तसेच विकास आराखडा १९९३ व त्यानंतर झालेल्या बदलाची माहिती

## विवेचन

सि.टी. सर्व्हे क्र.५३, कोथरूड गावठाण येथील इमारतीला दि. २५.१.१९९५ रोजी पुणे महानगरपालिकेने भोगवटापत्र दिले. या बांधकामासमोर १०० फुटी डी.पी. रस्ता असल्याचे कागदपत्रांमध्ये दाखविले आहे, तरीही या रस्त्यावर इमारत बांधकामास २००४ साली कोणत्या नियमाने परवानगी दिली, याचे नेमके स्पष्टीकरण व माहिती महानगरपालिका देत नाही, त्यामुळे सि.टी. सर्व्हे क्र.५३ मधील रहिवाशांवर अन्याय होत आहे, असे लेखी प्रतिपादन अपीलकर्ता श्री. विजय शंकर देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेली तक्रार क्र. ८४ व अपील क्र.५४ यांमध्ये केले आहे. सुनावणीस अपीलकर्ता गैरजहजर होते.

श्री. देसाई यांना विहित मुदतीत माहिती देण्यात आली. मूळ अर्जाव्यतिरिक्त माहिती त्यांनी प्रथम अपिलाच्या अर्जात मागितली होती. त्याचीही पूर्तता करण्यात आली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका श्री. अनिरूध्द घन:श्याम पावसकर व अपिलीय प्राधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका श्री. मदन रामचंद्र आढारी यांनी केले.

श्री. देसाई यांनी मूळ अर्जात सी. टी.सर्व्हे क्र.५३, कोथरूड समोर डी.पी. रस्ता बदलाबाबत व विकास आराखडा १९९३ त्यानंतर बदल झालेली माहिती एवढेच नमूद केले आहे. प्रथम अपिलाच्या अर्जात त्यांनी विस्ताराने तपशील नमूद करुन माहितीची मागणी केली आहे. सी.टी. सर्व्हे क्र. ५३ मधील इमारतीत आपण पहिल्या मजल्यावर राहतो. १०० फूट डी.पी. रस्त्याच्या जागी झालेली इमारत, खिडक्या, बाल्कनी यांना खेटून असल्यामुळे हवा व प्रकाश मिळण्यात अडचणी येत असून आपल्याला शारीरिक, मानसिक व व्यावसायिक नुकसान सहन करावे लागत आहे, असे श्री. देसाई यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे. ते लक्षात घेता जन माहिती अधिकाऱ्यांनी माहितीबाबतची तांत्रिक पूर्तता केली असली तरी त्यातील मूळ मुद्दयाचे उत्तर मिळत नाही. नागरिकांना ते मिळाले पाहिजे म्हणून, कोथरूड गावठाण सी. टी. सर्व्हे क्र. ५३ च्या विकास

आराखड्यात दर्शविलेल्या स.नं. ५४ मधील डी.पी. रस्त्यावर इमारत बांधण्यास परवानगी कशी दिली या बाबतच्या पूरक कागदपत्रांसह स्पष्टीकरणात्मक संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. डी. पी. रस्त्याबाबतची परवानगी कशी दिली, याच्या पूरक कागदपत्रांसह स्पष्टीकरणात्मक माहिती दि. १५.११.२००९ पर्यंत अपीलकर्त्यास देऊन जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. अनिरूध्द घनःश्याम पावसकर यांनी त्यानंतर एक आठवड्यात अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २२.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जॉर्ज डिसोझा
३, शांती कुटी, प्लॉट नं.४५४, २४ वा रस्ता,
टीपी[redacted]एस तीन, वांद्रे (पश्चिम), मुंबई-५० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जावळी,
ता.जावळी, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४१ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६ .५ .२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा श्री.एस.वाय.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जावळी,
ता.जावळी, जि.सातारा श्री.आर.जे.चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.२.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जमिनीच्या प्लॉटनुसार नक्कल मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.जॉर्ज डिसोझा यांनी केली होती. प्लॉट पडलेले नसून त्यासाठी जमिनीची मोजणी करून घ्यावी लागेल, असे त्यांना कळविले. त्यांनी मोजणीसाठी अर्ज केला परंतु सर्व संबंधितांची संमती नसल्यामुळे मोजणी झाली नाही. त्यामुळे आपला अर्ज निकाली काढावा, असा जबाब श्री.डिसोझा यांनी दि.२८.१.२००९ च्या पत्रान्वये दिला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जावळी, जि.सातारा श्री.आर.जे.चव्हाण यांनी श्री.डिसोझा यांच्या संबंधित पत्राच्या प्रतीसह केले.

अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत संबंधित माहिती देण्यात आली आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेश खन्ना
सी-२७, पाचवा मजला, ग्रीन एकर्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
सर्व्हे क्र.१९, साळुंखे विहार रोड, कोंढवा, पुणे-४८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर (१), पुणे, डी, गुलटेकडी मार्केट यार्ड, पुणे-३७ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५१अ / पुणे / |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेश खन्ना
सी-२७, पाचवा मजला, ग्रीन एकर्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
सर्व्हे क्र.१९, साळुंखे विहार रोड, कोंढवा, पुणे-४८
**अपिलीय प्राधिकारी** उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर (१), पुणे, डी, गुलटेकडी मार्केट यार्ड, पुणे-३७ श्री.सुनिल देशमुख
**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ श्री.विनायक कोकरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ग्रीन एकर्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. या संस्थेचे आपण सभासद असतानाही आपल्याला सभासद नसल्याचे सांगून माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.राजेश खन्ना यांनी केली.

श्री.खन्ना यांनी मागितलेली माहिती उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर या कार्यालयाकडील नसून संस्था स्तरावरील आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. परंतु सभासद म्हणून श्री.खन्ना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखालील नियम व संस्थेचे पोटनियम यातील तरतुदीनुसार संस्थेकडे वेगळा अर्ज करून माहिती मागू शकतात, असे त्यांना विहित मुदतीत स्पष्ट करण्यात आले. तसेच माहिती देण्याबाबत संस्थेलाही कळविले. मात्र श्री.खन्ना यांनी मागणी केलेल्या माहितीप्रकरणी सहकार न्यायालय, पुणे येथे दोन वेगवेगळे दावे दाखल केले असल्यामुळे ती माहिती न्यायालयातच सादर करण्यात येईल, असे संस्थेने दि.३१.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. त्याचीही माहिती श्री.खन्ना यांना दिली, असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी नमूद केले. सभासद असल्यास श्री.खन्ना यांना संस्थेने माहिती दिली पाहिजे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), पुणे श्री.विनायक कोकरे यांनी केले.

अपीलकर्त्यास आठ दिवसात माहिती देण्याचा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार पूर्तता न झाल्याची तक्रार श्री.खन्ना यांनी आयोगाकडे केली. परंतु दरम्यान, सहकारी गृहनिर्माण संस्थांना माहितीचा अधिकार अर्धिा नयम, २००५ लागू होत नसल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने श्री.भास्कर शंकरराव कुलकर्णी विरुध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर व इतर-२ यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र.५२९४/२००८, दि.२८ एप्रिल २००९ मध्ये दिला. हे लक्षात घेता संस्थेचे प्रतिपादन मान्य करून, अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २७.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळकृष्ण रघुनाथ आपटे
वरद विनायक, पत्रकारनगर, परांजपे कॉलनी, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र.सहाय्यक संचालक(तांत्रिक),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक(अतांत्रिक),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५२/ सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र.सहाय्यक संचालक(तांत्रिक),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे
**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक(अतांत्रिक),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.३.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

शासन निर्णयानुसार पदभरतीला दिलेली स्थगिती शासनाने उठविली आहे काय व उठविली असल्यास कोणत्या शासन आदेशाने, याची माहिती न देता जन माहिती अधिकाऱ्यांनी काही शासन निर्णयाच्या प्रती आपल्याला पाठविल्या. परंतु स्थगिती उठविली की नाही, हे त्यातून स्पष्ट होत नाही, असे लेखी प्रतिपादन अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण रघुनाथ आपटे यांनी केले आहे.

स्थगिती उठविली आहे काय व उठविली असल्यास कोणत्या शासन आदेशाने, अशी माहिती श्री.आपटे यांनी मागितली होती. दि.१५.१२.१९९२ च्या आदेशाने स्थगिती दिली होती. दि.१८.१.१९९६ चा सुधारित शासन निर्णय त्यांना पुरविण्यात आला. तरीही चुकीची व गैरलागू माहिती मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी अपील केले. त्यानुसार त्यांनी न मागितलेली, परंतु पूरक अशी आणखी काही कागदपत्रे त्यांना पुरविण्यात आली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.बी.व्ही.विरणक व अपिलीय प्राधिकारी श्री.एम.जी.पाटील यांनी केले. वस्तुतः श्री.आपटे यांना जन माहिती अधिकाऱ्यांच्या पातळीवरच सर्व माहिती मिळालेली असताना, पुढील अपिले करणे हे सर्व यंत्रणांचा वेळ अकारण घालविणे आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अल्ताफ रहिम शेख
हाजी इब्राहिम ईस्टेट, स्टेशन रोड, अहमदनगर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माण(दहिवडी),
ता.माण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, माण(दहिवडी),
ता.माण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माण(दहिवडी),
ता.माण, जि.सातारा श्री.आर.आर.सोनटक्के

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. — |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे सुनावणीलाही गैरहजर होते.

अपीलकर्ता श्री.रहिम अल्ताफ शेख यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील काही तरतुदींची माहिती मागितली होती. ही माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माण (दहिवडी) श्री.पी.एस.कुलकर्णी यांनी विहित मुदतीत दिली. प्रथम अपिलाच्या वेळी आणखी काही माहिती त्यांनी मागितली.ती देण्याचा आदेश दिल्यानुसार तीही पुरविण्यात आली, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माण (दहिवडी) श्री.आर.आर.सोनटक्के यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.१०.२००९